# पर्यावरण जनजागरण

## भाग २


### लेखक

चंद्रकांत शहासने

(देशभक्तकोशकार)


### कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या सौजन्याने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

पुस्तकाचे नाव : पर्यावरण जनजागरण भाग २

लेखक : चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार) पुणे
मो.क्र. – ९८८१३ ७३५८५

प्रकाशक : बहुजन साहित्यधारा, पुणे
११ ए, राहुल कॉम्प्लेक्स,
चौथा मजला, पौड रोड, पुणे.
दुरध्वनी : ९८८१३७३५८५
हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

प्रकाशन दिनांक : २५ डिसेंबर २०२२ पहिली आवृत्ती

मुद्रक : श्री वेंकटेश पब्लिकेशन, पुणे
हिंगणे खुर्द, सिंहगड रोड. मो. क्र. ८२३७८ ९३३४७

पुस्तकाचे हक्क : ॲड. नंदिनी शहासने

ही पुस्तिका कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणेच्या राष्ट्रभक्ती पर्यावरण आणि आरोग्य साक्षरता अभियानअंतर्गत प्रकाशित केली.

मूल्य : रूपये ३०/–

संपर्क : श्री. हेमंत प्रभाकर आळवे, ठाणे
मो. : ९३२२२६९७२१
श्री. अशोक जनार्दन फडणीस, मेणोली–वाई
९८५०५ ०९४१६
श्री. भानुदास सोपान पायगुडे, धनकवडी–पुणे
९८५०३५१०३५

Or Pay to VPA

कर्नाळा चॅरिटेबल ट्रस्ट पुणे या संस्थेस दिलेल्या देणग्या आयकर
माफीस प्राप्त आहेत.

No.: THN/C.I.T.II/Tech/80G/104/2010-11/1479 Dt: 21/09/2010

# ज्ञानेश्वरी



**पाणी मुदला झाडा जाये । तृण ते प्रसंगेंचि जिये । तैसें एकां बोलिलें होये । सर्वांही कां ।।१७ ।। जोडे अमृताची सुसरी। ते प्राणातें अमर करी । स्नाने पापताप निवारी । गोडीही दे ।। २१८ ।।अध्याय सतरावा ज्ञानेश्वरी**

ज्ञानेश्वर माऊलीने सामाजिक पर्यावरणरक्षणासंदर्भात कृषी विषयाशी संबंधित दृष्टांत आपल्या ओवीतून कसा दिलेला आहे तो पहा...

**पाणी मुदला झाडा जाये । तृण ते प्रसंगेंचि जिये । तैसें एकां बोलिलें होये। सर्वांही कां ।।१७ ।।**

पाणी जे पाटानेपिकांपर्यंत जाते तेव्हा आजूबाजूचे गवतदेखील त्या पाण्यावर जगत असते.

जसं की एखाद्या व्यक्तीला केलेला उपदेश हा त्याच्या सभोवती असलेल्या तळागाळातील मंडळींनाही लाभदायी ठरतो. आता या ठिकाणी ज्ञानेश्वरी माऊली सांगते की समाजामध्ये एखादी चांगली वाईट गोष्ट घडत जाते तसे त्याचे परिणाम हे समाजाच्या तळागाळापर्यंत पोचतच असतात.

त्यामुळे सामाजिक समरसतेसाठी केव्हाही चांगलेच आचरण केले तर चांगलेच होणार. आता हे चांगले कसे घडणार त्याबाबत पुढे माऊली असं सांगते की,

**जोडे अमृताची सुसरी ।**
**ते प्राणातें अमर करी ।**

**स्नाने पापताप निवारी ।**

**गोडीही दे ।। २१८**

समाजाशी वागत असताना जसं काही अमृताने भरलेल्या घागरीतून (सुसरीतून) आपण लोकांना पाणी देतो. अमृत हा शब्द महत्वाचा आहे. यात जीवदान हा अर्थ अभिप्रेत आहे. सर्व पापताप, गैरसमज, दृष्टप्रवृत्तीही केवळ प्रेमाने नाहीशी होते. आपले संभाषण अमृतासारखे गोड दुसऱ्याला जीवदान देणारे असावे म्हणजे समाजामध्ये एकोपा राहुन परस्परांमधील संबंध हे दीर्घकाळ टिकतात.

निसर्गात दररोज घडणाऱ्या ज्या घडामोडी, त्याचा दाखला देत ज्ञानेश्वर माऊलीने आपल्या ओवीतून समाजाला परस्पर प्रेमभावनेने राहण्याचा संदेश या ओव्यांमधून दिलेला आहे. पाणी हेजसे तृणांसाठी,

गवतासाठी जिवनदायी आहे तसेच अमृतासारखे बोल हे समाजमनाला संजिवनी देणारे आहेत.

*****

# पवने परमाणू...



**कां पवने परमाणू उचलले। ते पृथ्वीपणावेगळे नाही गेले। आणि माघौतें जरी पडले। तरी पृथ्वीचिवरी ।।९/२५६. ज्ञानेश्वरी...**

ज्ञानेश्वरीमध्ये गुरुत्वाकर्षणाच्या नियमावलीबद्दल लिहिलेले आहे. वाऱ्यामुळे सूक्ष्म कण जरी हवेत उडून गेला तरी तो पुन्हा परत येऊन पृथ्वीवरच

कुठेतरी पडून राहतो. म्हणजे तो काही पृथ्वी सोडून जात नाही. पर्यावरणाच्या विकासाचा विचार करताना प्रत्येकाने हे तत्व लक्षात घ्यायला पाहिजे की आपण पर्यावरण विषयक केलेले प्रयत्न हे कधीही फुकट जाणार नाहीत. कारण आपण एखादे झाड लावले किंवा एखादी नदी दूषित होण्यापासून वाचवली किंवा आपला घरातला प्लॅस्टिकचा कचरा आपण योग्य रीतीने निचरा होईल अशा ठिकाणी ठेवला तर काय होणार आहे?

तर जे झाड आपण लावणार आहोत त्याचा वारा अथवा जी नदी आपण शुद्ध ठेवणार आहोत त्यातील पाण्याची वाफ हे अखिल विश्वात कुठेतरी जाऊन शुद्ध स्वरूपामध्ये बसणार आहेत आणि त्यामुळे सृष्टीचे वातावरण शुद्ध होणार आहे. सबब मी माझ्या घरापाशी काय करेन तर त्याचा जगाला उपयोग काय? असा कोणता विचार कोणीही करू नये. पर्यावरण रक्षणाचे काम आपल्याला हे विश्वचि माझे घर या भावनेतूनच करावे लागणार आहे. कारण अखिल विश्वाचे पर्यावरण संतुलन बिघडलेले आहे. त्यामुळे जसे जमेल तसे करा. त्याची नोंद निश्चितपणे कुठेतरी सजातीय दृष्टीने होणार आहे. जेव्हा हिमालयात बर्फ पडते तेव्हा सहाजिकच महाराष्ट्रामध्येदेखील थंडीची लाट येते. पर्यावरण या विषयाला सीमेचे बंधन नाही. हा विषय वैश्विक आहे. आपण जर एखाद्या ठिकाणी प्रदूषण केले, वेदना कंपने तयार केली तर त्याची दूषितऊर्जा ही दूरवर कुठे जाईल हे आपणास सांगता येणार नाही. पण जिथे जाईल तिथे ती विनाशच करेल. यासाठी पर्यावरण विषय लक्षात घेताना जास्तीत जास्त चांगलं काम कसं होईल याचाच विचार करावा. चांगले करा चांगले मिळेल.

*****



# आधी प्रपंच करावा नेटका

**आधी प्रपंच करावा नेटका। मग घ्यावे परमार्थ विवेका। तेथे आळस करू नका। विवेकी हो।।**

समर्थ रामदासस्वामींना अपेक्षित असलेला प्रपंच हा विश्वाचा प्रपंच आहे. ते म्हणतात, **चिंता करितो विश्वाची।**

समर्थ रामदासांनी दासबोध या ग्रंथातील बाराव्या दशकात विवेक वैराग्य सांगितले असून पहिला समास विमळ लक्षणाचा आहे.

या समासात समर्थ श्रोत्यांना सांगतात की आधी नेटका प्रपंच करा आणि नंतरच मन-बुद्धीच्या कसोटीवर घासून समाजसेवा,परमार्थ करा. हे करताना कोणत्याही प्रकारे कामचुकारपणा, तडजोड, झटपट व्हावे म्हणून काहीतरी टाळणे असल्या गोष्टी म्हणजे आळस करू नका .

आता याचा पर्यावरणीय दृष्टीने जेव्हा आपण विचार करतो त्यावेळेला हे लक्षात घ्यायला पाहिजे की प्रपंच हा मानवजातीला चुकलेला नाही. पण प्रपंच म्हणजे केवळ जन्माला येऊन, संसार थाटून, दोन चार मुलांना जन्म देणे आणि घरटे बांधून राहणे एवढाच नव्हे. तर समर्थांना जो प्रपंच दिसतो आहे तो विश्वाचा प्रपंच आहे. या प्रपंचामध्ये जळी-स्थळी-काष्टी-पाषाणी समाजाचा विकास, उत्कर्ष कसा होईल, यासाठी जे करायचे आहे ते सर्वांगपरिपूर्ण विवेकाने करावे.

आता एक गोष्ट लक्षात घ्या की, एखाद्या वृक्षाला फळे चांगली यावी यासाठी अगोदर त्या वृक्षाचे योग्य जागी योग्य रितीने रोपण करावे लागते.

त्याचे पाणी देऊन जतन करावे लागते. जेव्हा तो चांगला धडधाकट पुष्ट होऊन त्याचे खोड मजबूत होईल, फांद्यांचा विस्तार होईल, तेव्हाच ते झाड फळाफुलांनी भरून येऊ शकेल. जर त्याच्या पालन-पोषणामध्ये हयगय केली, आळस केला तर ते झाड सशक्त रहाणार नाही, खुरटेल. समाजाला फळे-फुले देण्यामध्ये ते कुचकामी ठरेल.

आपले देखील असेच आहे. आपण आळस केला. बालपणी विद्या, तंत्रज्ञान, प्रशिक्षण, श्रमप्रतिष्ठा, व्यायाम, योग, पाठांतर याकडे दुर्लक्ष केले तर आपले तारुण्य नेटके राहणार नाही. आपण अज्ञानी राहू. आपण अशक्त राहू. आपल्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळणार नाही. मग परमार्थ करणे कसे शक्य होईल? समाजसेवा कशी शक्य होईल? तर ज्याला परमार्थ करायचा आहे त्याने अगोदर त्याचा शारीरिक, मानसिक पाया अत्यंत सक्षम करायला पाहिजे. यालाच समर्थ रामदास स्वामी म्हणतात ‘‘आधी प्रपंच करावा नेटका‘‘

आपल्या देशाची सैन्यदले आहेत आणि ही सैन्यदले परमार्थिक भावनेने देशाचं रक्षण करतात. जर त्यांनी सैनिकी प्रशिक्षण घेतानाच आळस केला तर ते देशाचं रक्षण करू शकतील काय? समर्थांनी दिलेला जो उपदेश आहे तो बहुआयामी आहे. त्याचा सर्व बाजूंनी अभ्यास करायला हवा. यालाच परमार्थ विवेक असे म्हटलेले आहे. सद्यस्थितीत आपण प्राणवायू भरपूर प्रमाणात मिळावा यासाठी प्रयत्नशील आहोत. तेव्हा प्राणवायू देणारी यंत्रणा बळकट असावी यासाठी झाडे लावायला आळस करू नका. झाडे सशक्तपणे वाढतील यासाठी जेवढे कष्ट करावे लागतील तेवढे करा. झाडे अशीच लावा की ज्यांची भरपूर सावली, प्राणवायू देऊन पर्यावरण संतुलित करण्यासाठी मदत होईल. हाच आजचा विवेक होय.

*****



# देह आहे कृमींचे कोठारं।

**धन्य-धन्य हा नरदेहो।**
**येथील अपूर्वता पाहो।**
**जो जो की जे परमार्थ लाहो।**
**तो तो पावे सिद्धीते**
**समर्थ रामदास...**

पर्यावरण जनजागरण उपक्रमासंदर्भात एका शेतकऱ्याने मला समर्थ रामदास स्वामींचे पर्यावरण विषयक विचार ऐकवले आणि मी चकितच झालो. त्याने प्रथम मला असे सांगितले की जे पीक येते ते कसे येते? तर जमिनीमध्ये जीवाणू असतात कृमी कीटक हे सर्व असतात आणि ते मुळांना अन्न बनवून देतात आणि मग मुळे ते अन्न शोषतात आणि त्यातून पीक उत्तम येते. मी म्हटले कसे तर त्याने थोडक्यात सांगितले की तुम्ही गोमूत्र, शेणखत गांडूळ खत कशासाठी वापरता? गांडूळ खताने भूमीमध्ये पोकळी निर्माण होते आणि त्यात असंख्य जिवाणू तयार होतात. शेणखतात प्रचंड प्रमाणात जिवाणू असतात. या पुढे जाऊन त्यांनी असेही सांगितले की परमेश्वर कृपेने आपल्याला हा मानव देह मिळालेला आहे आणि त्याची थोरवी ही अपूर्व आहे. पण त्याचा वापर जर परमार्थासाठी तुम्ही केलात तर तुम्हाला जगाचे भले करणे सहज शक्य आहे. आणि तसे नाही वागलात तर ?. सारेच व्यर्थ।

शेवटी शरीरामध्ये काय आहे तर जे तुम्ही अन्न खाता त्याची विष्ठा होते, अन्नरस होतात. अखेरीस चांगले अन्नरस निर्माण व्हावेत यासाठी चांगले आचरण आणि सात्विक खाणे गरजेचे जसे असते तसेच शेतीचे आहे. पण विधिनिषेध सोडून आपण काहीही खाल्ले तर आपले शरीर हे देखील एक जंतूंचे कोठार होऊन जाते.

जसे आपल्या राहत्या घरामध्ये अस्वच्छता असेल तर घुशी, उंदीर , पाली, मुंगळे, ढेकूण, मांजरे, आळ्या वस्तीला असतात. यासाठी जशी देहाची काळजी घ्यायची तशीच घराची देखील काळजी घेणे गरजेचे असते. पर्यावरणासंदर्भात या शेतकऱ्याने दिलेले ज्ञान हे लाख मोलाचे होते. झाडे नक्की लावावी कुठली? आता आपण अलीकडे म्हणतो की आम्ही फळझाडे लावली तर माकडे येऊन त्याचा विध्वंस करतात. पण आम्ही फळझाडे लावली की माकडे का येतात? तर आपण जंगलातील वनस्पती तोडल्या आणि वन्यजीवांची आश्रयस्थाने नष्ट केली. तेव्हा पोट भरण्यासाठी जंगलातुन माकडे शहराकडे आली. जर जंगलात जाऊन आपण फळझाडे लावली, औषधी वृक्ष लावले तर त्यांचा उदरनिर्वाह जंगलातच होईल आणि मग गावात लावलेल्या फळ झाडांकडे माकडे,डुकरे येणारच नाहीत. तर हे असे आहे समर्थांचे पर्यावरण विषयक चिंतन। जेवढे आपण चिंतन करू तेवढा उपदेश अधिक मिळत जातो. आज ही वेळ आलेली आहे की संत वांग्ड्मयाचे पर्यावरण विषयक चिंतन करणे आणि समाजाला ते समजवून देणे ही प्रत्येकाचे एक कर्तव्य होऊन बसलेले आहे.

*****

# नामदेवांचा गाथा



**तुळसी पुष्पाहूनि आगळी। वृंदावनी ती मिरविली। देवे मस्तकी वंदिली। वंद्य झाली तिन्ही लोका।**

**तुळस वंदावी माऊली । अरे ही संतांची साउली। तुळसीपाशी वनमाळी। सदा रहात असे।।**

**तुळसीदळ भूमिवरी पडिले ।तें जरी मस्तकीं वंदिलें। कोटी तीर्थ स्नान केले। एवढे फळ नामा म्हणे ।।नामदेवाचा गाथा ।।६०९।।**

संत तथा भक्तशिरोमणी नामदेव महाराज यांनी तुळशीचे जे वर्णन केलेले आहे त्यातून पर्यावरण संतुलनात तुळसीचे महात्म्य काय आहे ते समजून येते. सर्व पुष्पांहून वेगळंपण आणि जिचा मान परमेश्वराने डोक्यावर घेऊन सिद्ध केलेला आहे. अशी तुळस सर्व प्राणिमात्रांना सावलीसारखी आणि आनंददायी आहे. आता हे मनोविज्ञान बाजूला ठेवून तुळसीचे एवढे महत्त्व काय आहे की ज्यामुळे प्रत्यक्ष पुरुषोत्तम असा वनमाळी श्रीकृष्ण त्या ठिकाणी अवतरतो. म्हणजेच तुळसीच्या सानिध्यात असलेली व्यक्ती ही निरोगी, बलवान असते. अर्थात तुळस ही २४ तास प्राणवायू देणारी औषधी वनस्पती आहे. तुळस ही मानवाच्या कफ,पित्त, आणि वात या तिन्ही विकारांवर अत्यंत उपयुक्त अशी औषधी आहे.

भूक, तहान, पोटदुखी, दम लागणे, उचकी, अमांश, दमा ,ताप सर्दी, पडसे, खोकला, त्वचारोग, कीटकांनी केलेले दंश, अशा सर्व रोगांवर तुळस अत्यंत उपयुक्त आहे. तुळस एँटीकॅन्सर म्हणून देखील सिद्ध झालेली असून सौंदर्यप्रसाधनांमध्ये देखील तुळसीचा वापर होत असतो. संतांनी आध्यात्मिक परिभाषेत सांगितलेले तुळसी महात्म्य हे माणसाला सदासर्वदा आरोग्यासाठी पर्यावरण रक्षणासाठी महत्त्वाचे आहे हे सिद्ध होत आहे.

यासाठी जागोजागी, सार्वजनिक ठिकाणी सदा आनंद, उत्साह आणि आरोग्य यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या तुळशीची रोपे लावली तर आपण निश्चितच पर्यावरणाचे संतुलन करू शकू.वृक्ष आणि जीवसृष्टी यांचं घनिष्ट नातं आहे यातून सुधारणावादी मानवाने बोध घेऊन वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि त्यातून पर्यावरणाचे रक्षण करणे ही राष्ट्रभक्ती आहे हे समजून आचरण करणे ही काळाची गरज आहे.

*****

# मन-बुद्धीची कातरी। रामनाम सोनेतोली ।।

## संत नरहरी सोनार.



पर्यावरणाचे संतुलन म्हणजे आत्मपरिक्षण. म्हणजेच पंचमहाभुतांचे संतुलन होय. जसे की प्राणापासून मन तयार होते आणि मनापासून सत्य असत्य निर्माण होते.

हाच मुद्दा संत नरहरी सोनारांनी आपल्या अभंगातून समाजाला संदेश रूपाने शिकविलेला आहे. जर आपले जीवन सुखी करायचे असेल तर मन आणि बुद्धी यांचा विचार करत विवेकबुद्धीने कोणतीही कृती करा. तीचे फळ चांगलेच मिळेल. जसे की कपडा कापण्यासाठी कातरीचा उपयोग करतो. तिला दोन पाती असतात आणि त्यातून अनावश्यक ते कापड कापले जाते किंवा कापड कापून त्याचा सोयीनुसार वापर केला जातो. आपल्या प्राणशक्तीमध्ये मन आणि बुद्धी ही दोन पाती असून यामध्ये आपण करीत असलेल्या कर्माचे फळ काय असेल याचा विचार करायचा. मनात आले म्हणून केले असे न करता मी एखाद्या ठिकाणी दगड मारला तर काय होईल? मी उघड्यावर कचरा टाकला तर काय होईल? त्यातून कुजणाऱ्या अन्नघटकांमुळे अनेक जंतू तयार होऊन त्याचा समाजाला कसा त्रास होईल. तेव्हा ते बाहेर न टाकता योग्य ठिकाणी खत करण्यासाठी टाकावे हे बुद्धी सांगते आणि मग माणूस खराब झालेले अन्न पदार्थ, कचरा एका ठिकाणी टाकून त्याचे खत बनवून राष्ट्रीय संपत्तीत भर टाकतो. माझ्याकडे रेडिओ आहे. सकाळी सकाळी मोठ्या आवाजात मी तो वाजवला तर त्यामुळे अनेकांची झोप मोड होऊ शकते हे विचारात

घेणे हे बुद्धीचे सामर्थ्य आहे. पहाटे पहाटे कर्कश्श आवाजात रेडिओ वाजवणे ही मनाची चंचलता आहे. मन सांगते की खूप मौज मजा करा, झोपा काढा, तत्वज्ञानाचा अभ्यास करू नका, कशाला उगाच डोक्याला ताप। पण विद्यार्थी मन विचार करते की, मी असा वागलो तर मी परीक्षेत नापास होणार आहे आणि माझी ज्ञानगंगा कुंठित होणार आहे. मी समाजात जगण्यास नालायक ठरेन. तेव्हा मला अभ्यास करायलाच पाहिजे हे बुद्धीचे सामर्थ्य आहे. जेव्हा माणूस मन आणि बुद्धी याचा विचार करून कृती करतो तेव्हा ती कृती चांगली होते. रामनामासमान। राम म्हणजे चांगल्या गोष्टीचा, कृतीचा विचार करणे होय. तेव्हा वृक्ष आणि जीवसृष्टी यांचं घनिष्ट नातंआहे. यातून सुधारणावादी मानवाने बोध घेऊन वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि त्यातून पर्यावरणाचे रक्षण करणे ही राष्ट्रभक्ती आहे हे समजून आचरण करणे ही काळाची गरज आहे.

******

# आम्ही वारीक... संतसेना महाराजांचा उपदेश



**आम्ही वारीक वारीक।**
**करू हजामत बारीक।**
**विवेक दर्पण आयना दाऊ।**
**वैराग्य चिमटा हालऊ।**
**उदकशांती डोई घोळू। अहंकाराची शेंडी पिळू।**
**भावार्थाच्या बगला झाडू। काम क्रोध नखे काढू।**
**चौवर्णा देऊनी हात। सेना राहिला निवांत।।**
**संत सेना महाराज**

जेव्हा समाज गुलामी आणि रूढी परंपरांमध्ये गुरफटलेला होता आणि गुलामगिरीमुळे अनेक सुसंस्कार मातीमोल झाले होते, त्यावेळेला वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून संतांनी अलौकीक असे सामाजिक समरसतेचे, परिवर्तनाचे आणि संतुलनाचे सामाजिक कार्य केले. समाजाचा ढासळलेला गाडा पूर्वपदावर आणण्यासाठी खूप प्रयत्न केले. यापैकी मध्यप्रदेशातील बांधवगड येथे नाभिक समाजात जन्माला आलेले संत सेना महाराज यांनी अभंग रचनेतून महाराष्ट्र भूमीपुत्रांना जो अलौकीक विचार दिला त्याचा विचार केला तर असे दिसून येते की, सेना महाराज सांगतात, आम्ही वारिक, म्हणजे आम्ही वारकरी आहोत आणि आम्ही बारीक हजामत करतो.

आता एक लक्षात घेऊ या की आपल्या नाभिक व्यवसायाचा दाखला देत ते म्हणतात... हजामत करणे म्हणजे काय? हाजमत म्हणजे दाढी करणे होय. दुसऱ्या एखाद्या माणसाला अत्यंत सडेतोडपणे उपदेश करणे आणि ज्ञानामृत पाजणे, चांगली कर्मे करण्यासाठी प्रवृत्त करत असताना, त्याच्या वाईट कर्मावरती घाला घालणे असे होय. यामुळे माणूस सरळ मार्ग स्वीकारत आणि सत्प्रवृत्ती कडे चालायला लागतो. माणसाचे वागणे हा त्याचा चेहरा समजला तर त्या चेहऱ्यावर केसाचे काळे खुंट दिसल्यामुळे चेहरा विद्रुप होतो. समाजामन स्वच्छ आणि नितळ करायचे असेल तर समाजाला उत्तम प्रकारच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते ते काम वारकरी म्हणजे संत करतात. आणि मग समाजाचे प्रतिबिंब पाहण्यासाठी आरसा दाखवतात तो असा की समाजाने विवेकाने कर्मे करावी. अहंकार जो सदासर्वदा सोबत फिरतो आहे त्याची शेंडी मुळापासून बांधण्याचे काम संत करतात. समाजामध्ये असलेल्या वाईट चालीरीतींमुळे समाजमनाला अनेकदा जखमा होतात, मने उध्वस्त होतात. ही काम-क्रोधाची नखे काढायचे काम सेना महाराज उपदेशातून करतात. आणि अखेरीस सांगतात की हे जे चार वर्ण आहेत, म्हणजे जी समाजव्यवस्था आहे ती समाज व्यवस्था सुदृढपणे उभी राहिली की मला खूप समाधान लाभेल.

**चौवर्णा देउनी हात। सेना राहिला निवांत।।** असा हा उपदेश देणारा अभंग पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे

वृक्ष आणि जीवसृष्टी यांचं घनिष्ट नातं आहे यातून सुधारणावादी मानवाने बोध घेऊन वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन आणि त्यातून पर्यावरणाचे रक्षण करणे ही राष्ट्रभक्ती आहे हे समजून आचरण करणे ही काळाची गरज आहे.

*****

# वाद संवाद भाषाविज्ञान

गेल्या अनेक वर्षापासून आपल्याकडे प्रत्येक गोष्ट विज्ञानाच्या कसोटीवर घासून पडताळणी करण्याचा एक प्रवाह चालू आहे.

अलीकडे विविध वक्तव्यांवरून जे वादंग निर्माण होत आहेत त्या संदर्भात यापुढे भाषा हा विषय देखील विज्ञानाच्या परिभाषेत घासून पुसून समजून घेणे गरजेचे आहे असे वाटते.

संपूर्ण विश्वात असंख्य भाषा आहेत. अर्थात या सर्व भाषांना देहबोलीची साथ असते आणि व्यक्त होणारी भाषा देहबोलीच्या साह्याने त्याचा मतितार्थ सांगत असते.

भाषेमध्ये श्लेष आणि उपमा दोन महत्त्वाचे अलंकार आहेत. कदाचित भविष्यामध्ये या दोन्हीही अलंकारांवर बंदी येण्याची शक्यता वाटते. कारण भाषा समजून घेण्याची संवेदना जर पराकोटीची एकांगी हटवादी असेल तर त्यातून केवळ वादच उत्पन्न होणार. कायदा, सुव्यवस्था आणि निकोप समाजव्यवस्थेकरिता संवाद महत्त्वाचा असतो.

एकच शब्द, एकच वाक्य विविध प्रकारच्या देहबोलीने विविधांगाने नि विविधार्थाने व्यक्त होते तेव्हा भावार्थ बदलतात.

भाषा समजून घेताना व्यक्तींमध्यील पूर्वग्रह हे देखील अत्यंत महत्त्वाचे असतात. परस्परांतील नातेसंबंध देखील महत्त्वाचे असतात. कोणत्या वेळी, कोणत्या प्रकारे, कोणत्या संदर्भात, कोणते वाक्य वापरले याची जाण भाषा समजून घेणाऱ्याला असणे तितकेच महत्त्वाचे आणि जरुरीचे असते. त्यामुळे भाषा समजून घेताना काळ हा देखील तितकाच महत्त्वाचा असतो.


प्रत्येक बारा कोसावर भाषा बदलते त्यामुळे बोलणे समजून घेताना मायबोलीतील पारंपारिक शब्दांचे संदर्भ व भावार्थ याचा देखील अभ्यास करणे क्रमप्राप्त होते.

विदर्भातील झाडीबोली, धुळे जळगावची अहिराणी, डहाणूची वारली, पालघरची वाडवळी, जनजातीमधील कातकरी, ठाकरी,कोरकू, रायगड ठाण्यातील मधील आगरी, कोकणातील मालवणी अशा विविध बोलींतून आपली मराठी प्रमाण भाषा तयार झालेली आहे. अशाप्रकारे प्रत्येक प्रमाणभाषेच्या विविध बोली असतातच. एखाद्या भूभागावर जो शब्द सहजगत्या दैनंदिन व्यवहारात उच्चारला जातो तो दुसऱ्या भूभागात अपमानकारक समजला जातो. सद्याच्या सुधारणांच्या गतिमान युगात स्थलांतरे मोठ्या प्रमाणात होत आहेत. त्यामुळे सद्याच्या भाषेच्या भावार्थासंदर्भातील वादांचे स्वरूप पहाता भाषाविज्ञानाचा अभ्यास करणे ही काळाची गरज ठरणार आहे.

**लेखक : डॉ. चंद्रकांत शहासने (देशभक्तकोशकार)**
**मोबाईल क्रमांक : ९८८१३७३५८५**

चंद्रकांत शहासने लिखित

# वृक्षलागवडीचा हरिपाठ



चला लाऊ झाडे, वाढवूया वने ।
टाळू सर्व चाळे, दुष्काळाचे ।।१।।

फळ झाडे लावू, औषधी हे वृक्ष ।
करण्या सशक्त, भारत देश ।।२।।

वाढताची झाडे, अडती वादळे।
धूपही थांबते, रानोमाळ ।।३।।

वृक्ष वेली मित्र, मानवाशी सदा।
सगेसोयरे जे, सदैवची ।।४।।

सोय करणारे, असती सोयरे।
वृक्षवल्ली तैसे, मानवासी ।।५।।

म्हणोनी मानवा , कर तू विचार।
नको तोडू झाड, जन्मोजन्मी ।।६।।

झाडे लावूनिया, थाटावा संसार।
करावे संस्कार, संवर्धन ।।७।।

पर्यावरणाचे, रक्षण सदैव ।
मानवाचे हीत, सदैव ची ।।८।।

हरी मुखे म्हणा, करा लागवड।
वृक्षसंवर्धन, राष्ट्रभक्ती ।।९।।

टिळा विरक्तीचा, लावा कपाळास।
करण्या सशक्त, वनराई ।।१०।।

नामा तुका, संत सांगती सदैव।
वृक्षवेली आमचे सोयरेच ।।११।।

ऐकावे हो जना, सांगतसे चंदू ।
वृक्षवल्ली वंदू, देवासम ....।।१२।।

*****